सकाळ



पिंपरी : डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयात आयोजित सायबर सुरक्षा मोहिमेत सहभागी विद्यार्थी.

# 'डॉ. डी. वाय. पाटील'मध्ये सायबर सुरक्षा मोहीम

**पिंपरी, ता. २५ :** डॉ. डी. वाय. पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या संगणकशास्त्र विभाग व क्विक हिल फाउंडेशन यांच्यातर्फे सायबर सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ३८ स्वयंसेवकांनी वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन २२ हजार ३५८ विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबाबत माहिती दिली. तसेच त्यांनी सायबर सुरक्षा ई-बुक डाउनलोड केले.

महाविद्यालयातील ७०० विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबद्दलची प्रतिज्ञा घेऊन अभियानाचा समारोप झाला. या वेळी उपप्राचार्य डॉ. किशोर निकम, प्रा. डॉ. सुजाता पाटील, प्रा. विद्या बनकर उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. पी. डी. पाटील, सचिव डॉ. सोमनाथ पाटील, प्राचार्य डॉ. रणजित पाटील, उपप्राचार्य प्रा. जयवंत बाबर, उपप्राचार्य प्रा. लता ईकार यांनी अभिनंदन केले. क्विक हिल फाउंडेशनचे समन्वयक अजय शिर्के, सुगंधा दाणी, गायत्री पवार व क्षितीजा शिर्के यांनी संयोजन केले. प्रा. शिवानी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

Pune, PCMC-Today
26/12/2022 Page No. 6